**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
वेबसाईट : (www.shivajiuniversity.com व www.unishivaji.ac.in)
E-mail : coe@unishivaji.ac.in, appointment.a@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– परीक्षक नियुक्ती विभाग 2609102, 2609103.
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ :– शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/चव्हाण/5196 दि. 25/10/2018

प्रति,
मा. विभागप्रमुख/परीक्षा प्रमुख,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :– ऑक्टोबर/नोव्हेंबर,2018 या सत्रातील परीक्षेसाठी करावयाच्या अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक नेमणुकीबाबत...

महोदय/महोदया,

आपणास विदित आहेच की, हिवाळी सत्रातील विद्यापीठाच्या परीक्षा 23 ऑक्टोंबर, 2018 पासून सुरु होत आहेत. सदर परीक्षेकरीता बहि:स्थ व अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्तीची प्रक्रिया कार्यालयीन स्तरावर सुरू आहे.

विद्यापीठ अधिविभागातील अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांचे नियुक्ती आदेश या विभागाकडून पाठविले जाणार असून परीक्षेसाठी लागणारे कनिष्ठ पर्यवेक्षक, लेखनिक, शिपाई व इतर स्टाफ यांचे नियुक्ती आदेश या विभागाकडून देण्यासाठी अधिविभागाकडून नावांची यादी दिली जात आहे. नियुक्ती आदेश देण्यासाठी अधिविभागाकडून जी यादी दिली जाते त्यामध्ये परीक्षेचा कालावधी व कोणत्या कामासाठी नियुक्ती केलेली आहे याबाबतचा उल्लेख केलेला नसतो त्यामुळे नियुक्ती आदेश देणेबाबत अडचणी उद्‌भवत आहेत.

तेंव्हा ज्या पध्दतीने महाविद्यालयातील परीक्षेसाठी लागणारे कनिष्ठ पर्यवेक्षक, लेखनिक, शिपाई व इतर स्टाफ यांची नियुक्ती महाविद्यालयाचे प्राचार्य हे आवश्यकतेनुसार करतात त्याच पध्दतीने विद्यापीठ अधिविभागातील परीक्षेसाठी कनिष्ठ पर्यवेक्षक, लेखनिक, शिपाई व इतर स्टाफ यांची आवश्यकतेनुसार नियुक्ती संबंधीत विभागप्रमुख/परीक्षा प्रमुख यांनी करणेची आहे. तसेच सदर नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मानधन व इतर देयके प्रचलित नियमानुसार आदा करणेत यावीत.

सदरचे पत्र सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे तसेच सर्व संबंधीतांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

उपकुलसचिव
प्री–एक्झाम

**टिप :– अद्याप ज्या अधिविभागांनी अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांची नांवे या विभागाकडे कळविलेली नाहीत त्यांनी तात्काळ सदर नांवे या विभागास कळविण्यात यावीत.**